संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

## विद्यापीठात मानसशास्त्र : काल, आज आणि उद्या विषयावर द्विदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

### आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा संयुक्त सहभाग

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे संयुक्त विद्यमाने दि. २३ व २४ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत मानसशास्त्र : काल, आज आणि उद्या विषयावर कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात करण्यात आले आहे. कार्यशाळेसाठी सल्लागार समिती गठित करण्यात आली असून त्यामध्ये कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, प. व मू. मंडळाचे संचालक तथा प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख व वि. व ले. अधिकारी डॉ. भारत कऱ्हाड यांचा समावेश आहे.

कार्यशाळेचे उद्घाटन दि. २३ फेब्रुवारीला ११.०० वाजता विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात होणार आहे. पहिल्या सत्रात नागपूरचे डॉ. निहाल रंजन मृणाल 'मनोविज्ञानापुढील आव्हाने : त्याचे भविष्य आणि अंतःविषयाचे महत्व' या विषयावर, तर दुपारच्या सत्रात 'मनोचिकित्सक : समकालीन वय, समस्यां, निदान आणि उपचारांमधील कार्य' या विषयावर एस.एन.डी.टी. विद्यापीठ, पुणेच्या मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. मानसी राजहंस मार्गदर्शन करतील. सायं. ५.३० वाजता मानसिक नाटक व लघुपटाचे सादरीकरण होईल.

दि. २४ फेब्रुवारी रोजी प्रथम सत्रांतर्गत डॉ. वनिता पटवर्धन, जनता प्रबोधिनी पुणे यांचे 'संस्थेतील परस्पर संबंधाचा मानसिक दृष्टीकोन' या विषयावर, तर दुसऱ्या सत्रात 'कृत्रिम बुद्धीमत्ता आणि मानवी वर्तन - पुढील परिणाम आणि आव्हाने' या विषयावर एलफिन्स्टन महाविद्यालय, फोर्ट, मुंबईचे मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास पाध्ये यांचे व्याख्यान होईल. दुपारी २.०० वाजता मॉडेल आणि पोस्टर सादरीकरण होणार असून दुपारी ३.३० वाजता समारोपीय कार्यक्रम संपन्न होईल.

तरी द्विदिवसीय कार्यशाळेला विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन कार्यशाळेचे संयोजक तथा आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, कार्यशाळेचे आयोजक डॉ. वनिता राऊत, डॉ. शुभांगी रावळे व डॉ. ज्ञानेश्वर गाटकर यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १६/०२/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी